D.A.V. PUBLIC SCHOOL, THANE

SESSION : 2022-2023

PERIODIC TEST II (HALF YEARLY EXAMINATION)

SUBJECT -MARATHI

STD:VIII **MAX MARKS: 80**

DATE: 16/09/2022 **TIME- 3HRS.**

सूचना : सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक .

विभाग अ = 10 गुण वाचन विभाग

विभाग ब = 20 गुण लेखन विभाग

विभाग क = 15 गुण व्याकरण विभाग

विभाग ड = 35 गुण पाठावरील प्रश्न विभाग

विभाग -अ

प्रश्न 1. खालील गद्य उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (5)

अपंग मुलांवर कमलाताई होस्पेट यांची विशेष माया .वैज्ञानिक उपकरणे वापरून त्यांनी आपल्या अपंगत्वावर मात करावी म्हणून त्या धडपडत .सर्वात वाईट अवस्था मतिमंद मुलांची असते . वयाबरोबर शरीर वाढते ,पण बुद्धी वाढत नाही .बहुतेक लोक अशा मुलांचा राग ,तिरस्कार करतात .अशा मतिमंद मुलांसाठी 'नंदनवन' नावाची एक संस्था त्यांनी सुरु केली ,जयास जगात कोणी नाही,तयाची होईन मी आई ' ही जणू त्यांची प्रतिज्ञा !

त्यांची आई त्यांना म्हणाली , यमे बायकामुलांसाठी तू इतक केलसं.म्हाताऱ्याकोता-यासाठीही काही कर ना .आपण कुणालाही हवसं वाटत नाही ,ही जाणीव किती भयंकर आहे !"आईची ही इच्छा कमलाबाईनी पूर्ण केली .नागपूर -उमरेड रस्त्यावर अशा वृद्धांसाठी त्यांनी 'पंचवटी' उभारली .

प्रश्न 1.कमलाबाई कशासाठी धडपडत ?

2. नंदनवन नावाची संस्था कोणासाठी आहे ?

3. कमलाबाईची प्रतिज्ञा कोणती होती?

4. वृद्धांसाठी कमलाबाईनी कोणती संस्था सुरु केली ?

5 समानार्थीशब्द लिहा . 1) माता 2) रस्ता

प्रश्न 2.खालील गद्य उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (5)

आपल्या झेंड्याचा मधला भाग पांढरा आहे . त्याचा अर्थ काय ? पांढरा रंग प्रकाशाचा ,सत्याचा व साधेपणाचा निदर्शक आहे आणि या झेंड्यावरील अशोकचक्र काय सांगते ?ते सद्गुणांची ,धर्माची खूण सांगते .या झेंड्याखाली काम करताना आपण धर्ममय राहू ,सत्यमय राहू असा त्याचा अर्थ आहे .आपल्या वर्तनाची ही सूत्रे राहू देत .या चक्राचा आणखी काय अर्थ आहे ?चक्र म्हणजे गती .हे चक्र सांगते की गतिमान राहा . डबक्यात अडकून राहू नका .केशरी रंग त्यागाचा नि नम्रतेचा निदर्शक आहे .आणि हिरवा रंग म्हणजे हरितश्यामल भूमातेचा .या ध्वजाखाली उभे राहून सेवावृत्तीने नि निरहंकारपणे आपण पृथ्वीवर स्वर्ग निर्मूया.

प्रश्न :1 पांढरा रंग कशाचा निदर्शक आहे ?

2 चक्र ही कशाची खूण आहे ?

3 चक्र आपणास काय सांगते ?

4 पृथ्वीवर स्वर्ग कसा निर्माण करता येईल ?

5 समानार्थी शब्द : 1 झेंडा 2 चाक

<u>विभाग -ब</u>

प्रश्न3. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर 70ते80 शब्दात निबंध लिहा. (8)

1)माझा आवडता सण 2) मी चित्रकार झालो तर ---- 3) शेतकऱ्याचे आत्मवृत्त .

प्रश्न4.मुद्द्याच्या आधारे कथा लेखन करा तिला शीषर्क देऊन तिचे तात्पर्य लिहा. (7)

मुद्दे : नदीच्या काठी झाड ------झाडावर कबूतर -----मुंगी पाण्यात पडते ----कबूतर पान टाकून मुंगीला वाचवते ------- शिकारी कबुतरावर बंदुकीचा नेम धरतो ------- मुंगी पायाला चावते ---- नेम चुकतो ------कबूतराचा जीव वाचतो ---------- तात्पर्य.

किंवा

मुद्दे : एका नदीवर एक अरुंद पूल..... दोन्ही बाजूने एकाच वेळी एक एकेक बोकड येतात.....नदी पलिकडे जाण्यासाठी एकालाच मागे जाणे जरुरीचे दोघेही भांडतात..... पाण्यात पडतात.....थोड्या वेळानंतर..... दोन बकऱ्या येतात..... त्यानांही पलिकडे जायचे असते..... त्यांना एक युक्ती सुचते..... एक खाली वाकते .....दोन्ही बकऱ्या आपापल्या मार्गाने जातात.....

प्रश्न 5. खालील पैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. (5

तुमच्या घरी गणेश उत्सव कशाप्रकारे साजरा झाला त्याचे वर्णन करणारे पत्र मित्र /मैत्रिणीला लिहा .(पत्राखाली लिफाफा आवश्यक) किंवा

तुमच्या शाळेत प्रजासत्ताक दिन कसा साजरा केला याचे वर्णन करणारे पत्र मित्राला लिहा. (पत्राखाली लिफाफा आवश्यक)

विभाग -क

प्रश्न 6. अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा . (कोणतेही 4) (4)

1. भरत नेहमी अभ्यास करतो .
2. गणेश गावाला जात होता .
3. त्याचा आवाज चांगला आहे .
4. त्याने अभ्यासात प्रगती केली .
5. कारले कडू आहे .

प्रश्न 7. वाक्यांचे काळ ओळखा . (कोणतेही 3) (3)

1. आम्ही गावाला जाऊ .
2. प्रकाशने गाणे गायले .
3. लता अभ्यास करते .
4. उद्या शाळेला सुट्टी आहे .

प्रश्न 8. समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही - 4) (2)

1. कर्णिका - 2. गोष्ट - 3. गाव - 4. पाणी 5. किनारा

प्रश्न 9. विरुध्दार्थी शब्द लिहा. (कोणतेही - 4) (2)

1. मागे 2. ओला 3. मित्र 4.स्वावलंबी 5. मागे

प्रश्न 10. शब्दांचे वचन बदला. (कोणतेही - 4) (2)

1.ब्रश 2.दगड 3.होडी 4. गाव 5.रंग

प्रश्न 11. शब्दांचे लिंग बदला. (कोणतेही - 4) (2)

1. चिमणा 2. मामा 3. शिक्षक 4. ती 5.मुलगा

विभाग -ड

प्रश्न 12. खालील प्रश्नाची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 3) (12)

1. 'पोटाबद्दलची तक्रार सांगून सर्व इंद्रियांनी ती तक्रार कारणे सांगा .
2. लेखकाने सांगितलेले व्यायामाचे महत्त्व सांगा .
3. जिगरबाज भटके शब्दसमूहाचा अर्थ लिहा.

4. खडकावर काढलेल्या चित्रांना रंग देण्यासाठी लेखकांनी कोणत्या गोष्टीचा व कसा वापर केला ?

प्रश्न .13 खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही २) (8)

1. तन सुदृढ आणि मन विशाल' या शब्दसमूहाचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा .
2. आभाळाची आम्ही लेकरे ,काळी माती आई जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही या ओळीचा भावार्थ लिहा .
3. 'इमान आम्हा एकच ठावे घाम गाळुनी काम करावे' या ओळींचा भावार्थ करा.

प्रश्न 14. एका वाक्यात प्रश्नाची उत्तरे लिहा. (कोणतेही-5) (5)

1. वास घेण्याचे जास्तीचे काम करणारी कोण आहे ?
2. अजिबात काम न करण्याचा आरोप असणारे कोण आहे ?
3. कष्टकऱ्याची वस्ती कुठे आहे ?
4 .लेखक बागेत काय काय करायचे ?
5. लेखकाचे प्राथमिक शिक्षण कोठे झाले ?
6.प्रगतीची नवपरिभाषा कोणती ?

प्रश्न 15. रिकाम्या जागा भरा. (5)

1 आभाळाची अम्ही लेकरे ---------- माती आई |
2 मला ---------- पुरस्कार मिळाला .
3 अशा कितीतरी आठवणी घेऊन --------- येत असे .
4 हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या ----------
5 कोटि कोटि हे ---------- बाहू |

प्रश्न 16. म्हणी पूर्ण करा. (कोणत्याही पाच) (5)

1 थेंबे थेंबे ---------- 2 घरोघरी मातीच्या ----------
3 जशास --------- 4 आंधळा दळतोय ----------
5 दिव्याखाली --------- 6 गर्वाचे घर ----------
